महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

# पक्षीमित्र

■ वर्ष सातवे ■ अंक १ ला ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ ऑक्टोबर २०१६ पाने-१०

### संपादकीय

## जंगल म्हणजे काय?

विस्तीर्ण भूभागावर नैसर्गिकरीत्या उगवलेला झाड-झडोरा म्हणजे 'जंगल' अशी आपली धारणा असते. पण कायद्याच्या भाषेत धारणा टिकू शकत नाही. तिथे हवी असते 'व्याख्या'. भारतातील पहिला जंगलविषयक कायदा ब्रिटिशकाळात पारित झाला, तो भारतीय वन कायदा १९२७. त्यात जंगल किंवा जंगलजमीन याबद्दलची सुस्पष्ट व्याख्याच नव्हती. स्वातंत्र्योत्तर काळात मंजूर झाला वनसंवर्धन कायदा १९८०. त्यातही हीच परिस्थिती होती. १९९६ मध्ये निलगिरी वनसंरक्षणाच्या संदर्भात गोदावर्मन प्रकरणाचा निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने एक सर्वसामान्य अशी व्याख्या करताना तत्संबंधीची शब्दकोशीय (कोणता शब्दकोश?) व्याख्या १९८० च्या कायद्यात अनुस्युत समजावी असा निर्णय दिला. शिवाय सरकारी नोंदीत ज्याची 'वन' अशी नोंद झाली असेल तेही 'वन' समजावे अशी पुस्ती जोडली. त्याचप्रमाणे कोणत्याही राज्य सरकारने Research in Ecology and Environment ह्या बंगलोरस्थित संस्थेच्या पूर्व परवानगीशिवाय वनजमिनीचा वापर अन्य कारणासाठी करण्याची परवानगी देऊ नये असे निर्धारित केले.

२००६ मध्ये फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया या संस्थेने वनाची व्याख्या सुचविली होती.

२००७ साली ह्या संस्थेने वन ही संज्ञा किमान ७.५ हेक्टर जमिनीवर किमान २ ते ५ मीटर उंचीची झाडे असतील ज्याच्या शेंड्यांनी १०% किंवा अधिक जागा व्यापली असेल, असे म्हटले. त्यावर पुढे काही घडले नाही.

२५ ऑगस्ट २०१४ रोजी वनमंत्रालयाने २० राज्य सरकारांच्या तज्ज्ञ समितीने सुचविलेल्या प्रस्तावांवर विचार करण्यासाठी सभा घेतली.

डिसेंबर २०१४ मध्ये वनमंत्रालयाने वनाची व्याख्या करणारा मसुदा प्रस्तुत केला.

२०१६ च्या मसुद्यात वनजमिनीचा शब्दकोशातील अर्थ ग्राह्य धरून राज्यांची दोन गटात वर्गवारी करून त्यासाठी वेगळे निकष सुचविले. शिवाय वनजमीन पर्यटनासाठी खुली करण्याची सूचना केली.

क्योटो बैठकीसाठी वनाची आणखी वेगळी व्याख्या सुचविली.

थोडक्यात अजूनही जंगल म्हणजे काय हे प्रकरण घोळातच आहे.

- दिगंबर गाडगीळ

३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक - ४२२००५

स्थिरभाष : (०२५३)२५७७९६८, चलभाष : ९८८१०७९७११, E-mail : dgadgil09@gmail.com

**पक्षीमित्रच्या संदर्भातील पत्रव्यवहार, लेख संपादकांकडे पाठवावा. प्रशासकीय बाबींबद्दल मात्र चिपळूणच्या पत्त्यावर लिहावे.**

## अध्यक्षीय

आपली महाराष्ट्र पक्षीमित्र संस्था १९८१ सालापासून महाराष्ट्रात कार्यरत आहे. एखादी सार्वजनिक संस्था प्रदीर्घकाळ यशस्वीरीत्या चालविणे ही एक मोठीच कसरत असते. त्यासाठी लागते ते आपलेपणाने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे बळ. तसेच सातत्याने नवनवीन कार्यकर्ते येत राहिले तरच संस्थेला यश मिळत राहते. असे कार्यकर्ते आपल्याकडे आहेत.

नुकत्याच आंबेजोगाई येथे झालेल्या कार्यकर्ते व सल्लागार मंडळाच्या सभेमध्ये यावर प्रदीर्घ चर्चा झाली. या चर्चेतून एक कल्पना पुढे आली आहे की एकालाच जास्त काम देण्याऐवजी अनेकांना अगदी छोटी छोटी कामे सांगावीत व कार्यकर्त्यांची संख्या वाढवावी. यातून कोणावरही कामाचा ताण राहणार नाही व कामे पण होत राहतील. कामे अगदी महिन्यातून एक तास / महिन्यातून दोन तास घरबसल्या काम करणे असे असावे.

अशा प्रकारच्या कामासाठी तयारी असणाऱ्या सभासदांनी अवश्य संपर्क करावा.

- भाऊ काटदरे

९३७३६१०८१७

**टीप : हा अंक आपल्या मित्रांपर्यंत पोहचवा, ते सभासद होतील !**

# भवितव्य माळरानांचे !

गवताळ उघड्या माळरानावर एम.आय.डी.सी.च्या रस्त्याचे बांधकाम जोरात चालू आहे. तिथे एक डोंबारी (Ashy Crown Finch Lark) ची जोडी उड्या मारत गवतातील बिया, किडे शोधत असते. आकाराने चिमणीपेक्षा लहान असणारे हे डोंबारी. यामध्ये नर हा वरून वाळूसारखा तपकिरी व खालून काळा तर मादी पूर्णपणे तपकिरी रंगाची. मध्येच नर तीर सुटल्याप्रमाणे २५ मीटर पेक्षाही वर जातो व पंख मिटून सरळ खाली सूर मारतो. जमिनीजवळ आल्यावर आपल्या वेगाचा फायदा घेत पुन्हा वर जातो. प्रत्येक सूर मारण्याच्या वेळी हा व्टीव्टीव्टी... व्टीव्टीव्टी... असा आवाज करीत सुरेल गाणी गातो. बऱ्याच वेळा चालणाऱ्या या हवाई कसरतीनंतर तो एखाद्या दगडावर विसावा घेतो. बाजूला मादी मुरूम टाकलेल्या रस्त्याच्या कडेला आपल्या पायाने, चोचीने मुरमाड माती उकरू लागते. पंखाने माती उडवून त्या जागेला गोल आकार देणे चालू झाले. हे तिचे धूळस्नान नसून घरट्याची तयारी होती! लगेच आजुबाजूचा काडीकचरा, वाळल्या गवताची पाती असे जमा करून त्या उथळ कपासारख्या खड्ड्यात टाकण्याची सुरुवात झाली व आजूबाजूच्या मुरमाड खडे खड्ड्याच्या भोवताल लावले गेले. पाच मिनिटांमध्ये किमान चार वेळा घरटे बांधणीचे सामान आणून रचणे चालू.

मादीला नराची फक्त सोबत पण घरटे बांधण्याच्या कामात थोडासाही हातभार नाही. पूर्वेकडे तोंड असलेल्या या घरट्यालगत पाच-सहा इंचीचे रानतुळशीचे झाड उगवलेले. त्यामुळे त्याची थोडी सावली दुपारच्या वेळेला घरट्याला हमखास मिळणारी. दुसऱ्या दिवशी घरटे बरेच मोठे झाले. भोवताली पूर्ण खड्याची दगडी भिंत आतमध्ये गवत, कापूस, कापडाची चिंधी. थोड्या थोड्या वेळाने मादी घरट्यात बसून गोल फिरून आकाराचा अंदाज घ्यायची. दगडी भिंतीचे घरंगळून आतमध्ये पडलेले खडे चोचीत धरून पुन्हा भिंतीत लावायची व पुन्हा साहित्य आणण्यासाठी घरट्यापासून ६०-७० फुटांवर उडून जायची. नर देखरेख ठेवल्यासारखा सोबतच. कधी संधी मिळाली तर समागम करण्यासाठी त्याचा प्रयत्न तो तेवढा दिसून यायचा. मादी पंख फडफडत जमिनीवर पंख पसरवून, खाली पोट टेकवत नराला जवळ बोलविते. मग दोन ते तीन सेकंदांचा समागम. तेथून उडून पुन्हा घरटं बांधण्याची लगबग. १०-१५ मिनिटे सतत घरटे बांधणे, नंतर थोडी विश्रांती त्यामध्ये दोघांचे खाण-पिणे.

तिसऱ्या दिवशी घरटे बांधून पूर्णपणे तयार. आतमधील गवत, काड्या, कापडाच्या चिंध्या पूर्णपणे दाबून बिछाना तयार. सकाळी ६ ते १० चा वेळ जास्तीत जास्त घरट्याला दिलेला. चौथ्या दिवशी त्यात पांढूरक्या रंगाची व त्यावर तपकिरी रंगाचे छोटे ठिपके असलेली दोन अंडी दिसू लागली. आता मादी पूर्णवेळ अंडी उबविण्यासाठी घरट्यात बसून राहत होती. काही वेळाने नराने ही जबाबदारी उचलली. रानतुळशीचे झाडसुद्धा वाढल्यामुळे त्याची बरीच सावली घरट्यास मिळू लागली. रस्त्यावरून एम.आय.डी.सी.च्या मजुरांची ये-जा सुरू असायची. पण मादी निश्चलपणे अंड्यावर बसलेली. याबाबत नर थोडा लाजरा दुरून कोणाची चाहूल जरी लागली तरी उडून जायचा.

पाचव्या दिवशी सकाळपासून पावसाची रिमझिम चालू झाली. झाडामुळे पावसापासून थोडाफार बचाव होत होता. पण दुपारनंतर पावसाचा जोर वाढला. मोठमोठे पावसाचे थेंब अंगावर घेत मादी अंड्यांवर स्तब्ध बसलेलीच. थोड्या थोड्या वेळाने पायावर उभे राहून, पंख झटकून पुन्हा अंड्यांवरती बसायची. त्या दिवशी पाऊस रात्रभर पडत राहिला. त्यामुळे आता हे घरटे वाचण्याची शक्यता कमीच. पावसामुळे या दोघांना स्वत: चा जीव वाचविण्यासाठी घरटे सोडावे लागेल बहुधा. पण पाहतो तो काय? सकाळी मादी घरट्यावरून उठली व घरट्यात दोन्ही अंडी अगदी चांगल्या स्थितीत. म्हणजे पूर्ण रात्र तो वादळी पाऊस अंगावर घेत दोघांनीही आपले घरटे वाचविले होते तर!

पुन्हा आळीपाळीने अंडी उबविण्याचा कार्यक्रम सुरू झाला. १५ व्या दिवशी एका अंड्यातून पिल्लू बाहेर पडले. मादीने लगेच फुटलेल्या अंड्याचे कवच घरट्याबाहेर फेकून दिले. १६ व्या दिवशी दुसऱ्या अंड्यातूनही पिल्लू निघाले. आता दोन्ही पिलांना नर-मादी दोघेही आळीपाळीने किडे, नाकतोडे इ. भरवू लागली आणि अधून-मधून पिलांना ऊब देऊ लागली.

२१ व्या दिवशी पिले बरीच मोठी झाली व अंगावरील पिसांची वाढही बरीच झाली. पिलांना घास भरवताना १० ते ४० सेकंदापर्यंतही वेळ लागत होता. खाद्य पिलांच्या चोचीत पूर्णपणे भरविल्याशिवाय त्यांना ते खाता येणे शक्य नव्हते. मादीपेक्षा खाद्य आणण्यात, भरविण्यात नर जास्त सक्रीय पण तेवढाच सावध. घरट्याजवळ कुणाची हालचाल जाणवल्यास तो भरवायला यायचाच नाही. याउलट मादी बिनदिक्कत भरवायची. खाद्य भरविण्याची वारंवारता पाच ते सहा मिनिटांची असायची.

घरट्यालगत असलेली रानतुळस आता एक फुटापर्यंत झालेली व त्याच्या सावलीत पिलांना छान आडोसा मिळालेला. ती मुरमाड खडी व घरट्याशी पिलाचा रंग पूर्णपणे एकरूप झालेला. पालक जवळ आल्याबरोबर त्यांचा अन्नाच्या मागणीसाठी चोच उघडून चिवचिवाट चालू व्हायचा. आता काही दिवसात ती घरट्याच्या बाहेर येऊन आपल्या पालकांसोबत जगण्याचे धडे घेणार होती.

पण २३ वा दिवस उजाडला ती डोंबारी पक्ष्यासाठी संकटाची चाहूल घेऊनच. घरट्याचे ते उत्साही वातावरण पूर्णपणे लयाला गेलेले, रानतुळस तुटून पडलेली, घरटे पूर्णपणे उध्वस्त, नर मादी दोघेही घरट्याच्या भोवताली फिरताना दिसले. सूर्य वर चढला तशी तेथे एम.आय.डी.सी.च्या मजुरांची वर्दळ वाढली. रस्त्याच्या कडेला लाईटचे खांब गाडणे, माळरानावर कारखान्याकरता प्लॉट आखणी असे काम चालू झाले. डोंबारी नर-मादीने थोडं दुरूनच या गर्दीकडे पाहिले. आमचा हा झपाट्याने नष्ट होणारा अधिवास पुढे टिकून राहील का ? घरट्यासाठी आणि खाद्यासाठी आवश्यक असणाऱ्या या अधिवासाचे भवितव्य ते काय? असा विचार करीत कामगारांच्या कोलाहलात नर व मादी तेथून उडाले.

– किरण मोरे

*वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती.* kiranmorey1983@gmail.com

# चिमण्यांसोबत ...

मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील आमच्या घराला मागे-पुढे अंगण आहे. हे घर कौलारू असल्याने छपराच्या पुढच्या बाजूला वळचणीत ५० वर्षांपूर्वी साळुंक्यांनी आपली एक चिमुकली वसाहतच थाटली होती. चारच बिऱ्हाडांची इमारत समोरच्या बाजूच्या रस्त्यांवर वर्दळ अशी नव्हतीच. म्हणून कदाचित त्यांनी हा निर्णय घेतला असावा. आम्हीही त्यांना आमच्यात सामावून घेतले होते. 'साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी' असे संत तुकारामांनी लिहिले आहे. परंतु साळुंक्यांच्या कलकलाटात आम्हाला माधुर्य जाणवले नाही. पण काही वर्षातच बाजूचा रस्ता नगरपालिकेच्या ताब्यात गेला तेव्हा लोकांची ये-जा आणि वाहनांची वर्दळ वाढली. त्यामुळे साळुंक्यांनी आपली पिढीजात जागा सोडली. साळुंक्यांचा वावर आणि जागा नाहीशी झाल्याने सामसूम झाली.

बागेला तारेचे कुंपण होते. त्याच्या आतल्या बाजूस झुडुपांची दाट लागवड होती. त्यात एका पक्ष्याने वाटीच्या आकाराचे एक छोटे घरटे बांधले होते. ते रिकामे पडून लोंबकळू लागले, तेव्हा ते मला दिसले. म्हणजे अंडी घालणे, उबविणे, पिलांचे संगोपन इ. सर्व जबाबदाऱ्या पार पाडून त्या पक्ष्यांनी ते घरटे सोडले असावे, असा अंदाज मी बांधला. ते घरटे आणून मी कपाटाच्या काचदर्शिकेत ठेवले. पुढच्या विणीच्या हंगामात मी सहजपणे झुडुपांची न्याहाळणी करीत होते. जवळपास तसेच घरटे झुडुपात लपलेले मला आढळले. मी जवळ न जाता खिडकीतून निरीक्षण करी. लवकरच अंड्यातून पिले बाहेर येतील. किलकिलाट करतील. पंखात बळ आल्यावर हवेवर उडू लागतील. असे मनचे मांडे खात असताना अचानक कावळ्याने हल्ला केला. आणि माझ्या डोळ्यादेखत ते घरटे त्यातील तीन अंड्यांसह पळविले. त्यांचे जन्मदाते ते दोन चिमणे शोकाकूल जीव बराच वेळ त्या जागी इकडून तिकडे असे उडत होते.

पण दादागिरी करणाऱ्या या कावळ्यांच्या बाबतीत दोन वेगळेच अनुभव मला आले. स्वयंपाक घरातील खिडकीसमोर तगरीचं मध्यम उंचीचं एक झाड होतं. तिथं कावळा येऊन बसला की नाचण पक्ष्यांची जोडी पिसारा फुलवित हलकेच तिथे यायची. एक कावळ्याच्या पुढे एक मागे. नाचण पक्षी चिमणीपेक्षा आकाराने थोडा मोठा, रंग काळा. त्याच्या पिसांचा फुलोरा माणसाच्या पसरलेल्या बोटांच्या पंखाएवढाच. पण धिटाई किती! जोडीतील एका कावळ्याला हलकेच चोच मारायचा. तो वळला की दुसरा जोडीदार त्याला डिवचायचा. शेवटी कावळा गांगरून फांदीवरून उडून दूर जायचा. नाचण पक्ष्यांचे नर्तन, गायन कुणालाही आवडण्या सारखंच असतं. पण कावळ्यांच्या बाबतीतल त्यांचा खट्याळपणा काही औरच!

आणखी एक तगरीचं झाड खिडकीपासून जरा दूर परसातल्या माडाजवळ होतं. ते थोडं उंच होतं. बागेत मुंगुसाचंही वास्तव्य होतं. एका मुंगुसाला काही खाद्यपदार्थ किंवा भक्ष्य दिसल्यामुळे ते हस्तगत करण्याच्या प्रयत्नात असतानाच एक कावळा झपकन् तिथं आला. आणि ते भक्ष्य चोचीत पकडून तगरीच्या वरच्या फांदीवर दिमाखात बसला. डोळ्याचे पाते लवते न लवते इतक्यात मुंगुसाने उंच उडी घेऊन कावळ्याला तोंडात पकडले. आणि क्षणार्धात तो कुंपणातील झाडीत दिसेनासा झाला. मुंगुसाचा तो आवेश, ती उंच उडी आणि लाल डोळे अजून आठवतात.

माझा मुलगा आणि सून अंधेरी (पश्चिम) येथे राहात तेव्हाचा एक अनुभव त्यांच्या गच्चीवरचा. गच्चीवर एक-दोन फेऱ्या माराव्यात असे वाटून संध्याकाळी सहा वाजता मी तेथे गेले. फेरी मारताना मी अर्ध्यावरच थांबले. गच्चीच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीवर बरेच कावळे रांगेत एकमेकांना खेटून तटस्थ, निःस्तब्ध असे बसले होते. मी आले तेव्हा ते तिथे नव्हते. आणि आता चाहूलही लागू न देता ते कधी येऊन बसले आणि का हे मला कळेना. भीती वाटली. आणि मी झरझर उतरून खाली आले. परत गच्चीवर जाणे झाले नाही.

कावळ्यासंबंधीच्या आठवणी संपतच नाहीत, हे खरे! पुणे विद्यापीठातील शिक्षक निवासात तळमजल्यावरील घराच्या गॅलरीत मी उभी होते. अंगणात पाण्याने भरलेला बैठा, गोल आणि मोठा परळ आहे. एक कावळा आला. त्याच्या चोचीत दूर्वांची असते तशी जुडी होती. बागेत झाडाच्या मुळांशी टाकलेल्या नारळाच्या काथ्यातील एकेक धागा उसवून त्यांची निटनेटकी बनविलेली ती जुडी होती. कावळा परळाच्या काठावर बसला. त्याने ती जुडी चांगली भिजवून नरम केली. नंतर जुडी आपल्या एका पायाखाली दाबून ठेवली. पुन्हा चोच पाण्यात बुडवून पाणी पिऊन घेतले आणि ती जुडी परत आपल्या चोचीत धरली व तो उडून गेला. घरटे तयार करण्याच्या कामाचाच तो एक भाग असावा.

मुंबईत अंधेरी (पश्चिम) येथे मंगेशची राहती जागा चौथ्या मजल्यावर आहे हा उल्लेख आधी आला आहेच. इमारतीसमोर माळ्याने बगीचा चांगला राखला आहे. मध्ये हिरवळही असते. रोज सकाळी चिमण्यांचा एक थवा झपकन तिथे उतरायचा आणि काहीतरी टिपण्यात गढून जायचा. बहुधा त्यांना किडे-मकोडे मिळत असावेत. १९९१ ते २००५ ह्या काळात चिमण्यांची रेलचेल असायची. सकाळची न्याहरी आटपल्यावर त्या फिरतीवर निघायच्या. झाडाझुडुपात लपाछपी खेळणं, वेगवेगळ्या फ्लॅटमधील ग्रीलमधून डोकावून पाहणं, उंच तारेवर बसून इकडेतिकडे निरीक्षण करणं, दुपारी झाडांच्या फांद्यांवर झावळीत विश्रांती घेणं, थोडक्यात त्यांचा हा दिनक्रम रोज नव्याने पहायला मिळे. एवढेच नव्हे तर आम्ही चौथ्या मजल्यावर राहात असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने ग्रीलच्या बाजूच्या वळचणीत त्या घरटे बांधीत. ते आम्हाला दिसत नसे. पण पिलांची चिवचिव ऐकू येई. एका चिमणआईचा तर माझी सून श्रद्धा हिच्यावर पूर्ण भरवसा होता. कावळ्याची चाहूल लागली की ती हॉलमध्ये येऊन एवढा चिवचिवाट व थयथयाट करी की श्रद्धा धावत येऊन कावळ्याला हाकलीत असे. जणू तिच्या घरट्याचे व पिलांचे रक्षण करणे हे श्रद्धाचे कर्तव्य आणि तिचा हक्क होता.

२०१३ च्या सुमारास आम्ही अंधेरीतील घरी परत आलो. सकाळी उठल्यावर उत्सुकतेने हॉलमधील ग्रीलकडे येऊन उभी राहिले. हिरवळीवर साळुंक्यांची एक जोडी काहीतरी टिपत होती. पण बाकी सामसूम.

पृ.४ वर...

पृ.३ वरून...

चिमण्याच नाहीत. चिमण्या काय खातात? धान्य, चपातीचा चुरा, बिस्किटांचे तुकडे असे काहीबाही ताटलीत ठेवून पाहिले. पण एकही चिमणी फिरकली नाही. आमच्या घरची आणि आम्हा दोघांची जबाबदारी प्रेमाने सांभाळणारी आमची विजया एके दिवशी हातात भाताच्या हिरव्यागार लोंब्या घेऊन आली. तिने लोंब्यांच्या जुड्या ग्रिलच्या टोकाशी पण आतल्या बाजूस बांधल्या आणि काय आश्चर्य! कुठून कोण जाणे, लोंब्यांतील कोवळा भात खाण्यासाठी चिमण्यांची गर्दी उडाली. तोवर बाहेर पोपटही आले. आत चिमण्या आणि बाहेरून पोपट ह्यांच्या भाऊगर्दीत लोंब्यांच्या जुड्या हेलकावे खात होत्या. खरोखर चित्रीकरण करण्यासारखे ते दृश्य होते. बरेचसे धान्य फस्त झाले. तेवढ्यात एका पोपटाने धान्याचा तो जुडगाच खेचून घेतला आणि भरारी घेतली. आत ग्रीलमध्ये चिमण्या त्यांचे आवडते खाद्य शोधीत चिवचिवत राहिल्या, परिसरात उडू लागल्या.

चिमणीला तुळशीचे औषधी गुणधर्म माहीत असावेत. चिमणी तुळशीच्या पानांचे इवले इवले तुकडे तोडून खाताना मी दोन-तीनदा पाहिले. तुळशीच्या रोपट्यांच्या शेंड्यावरच्या पानांना कीड लागली. पण तीदेखील चिमण्यांनी साफ केली. तांदळापेक्षा फोलपटासकटची साळ जास्त आवडते असे वाटते. एक साळ चोचीत सरकवायची आणि तांदूळ चोचीत ठेवून मानेला झटका देऊन फोलपट बाहेर फेकायचं!

साधारण पहाटे साडेसहा वाजता चिमण्यांचा दिवस सुरू होतो. हळुवार अशी किचकिच सुरू होते. रात्रीच न्याहरीचा सरंजाम मांडून ठेवलेला असतो. आसपासात थोडी कुजबूज झाल्यावर न्याहरी सुरू होते. चिमण्याच्या गळ्यावर काळा गोलसर ठिपका असतो. तसा चिमणीच्या गळ्यावर नसतो. पक्ष्यांमध्येही नर दादागिरी करताना आढळले. एकदा तर चार-पाच चिमणेच परातीवर कब्जा करून धान्याचा फन्ना उडवित होते. अर्थात फन्नाही त्यांच्यासारखाच चिमणा. पाणी पिताना चोचीने पाणी ओढून घ्यायचं, चोच उंच करून पाणी पोटात जाऊ द्यायचं. दोन थेंब पोटात तर परत एक थेंब जलपात्रात.

दुपारी एक-दीड वाजता चिमण्यांचं कुटुंबही जेवायला येतं. त्यांच्यासोबत दोन बेबी चिमण्याही असतात. परातीच्या काठावर बसून शांतपणे आपलं जेवण उरकवायचं हे त्यांना ठाऊकच नाही. चोचीत दाणा घ्यायचा. ग्रीलच्या दांडीवर बसायचं. तो खाऊन झाला की चिवचिवत पुन्हा यायचं. यामुळे त्यांच्या विविध हालचालींचा एक मनोरम चलतचित्रपट पाहात आहोत असे वाटे. सोबत चिवचिवाटाचं पार्श्वसंगीत! शिवाय आपल्या पंखाने लगत बसलेल्या चिमण्याला किंवा चिमणीला दूर सारणे कधी चोचीला चोच भिडवून जाब विचारणेही चालत असे. ह्यातच त्या चिमणुल्या चिमण्या संधी साधून धडधडत्या हृदयाने थोडीफार पोटपूजा करीत. कधी दांडीवर बसत तर भोजनगृहात सामसूम दिसल्यावर येऊन चौफेर निरीक्षण करीत जमेल तेवढे अन्नपाणी गरम करीत. किती गोंडस आहेत त्या !

बगीच्यात एक बिट्टीचं झाड होतं. ते त्यांचा रात्रीचा निवारा होतं. पण गेल्या पावसाळ्यात ते कोसळलं. आवारात भिंतीच्या कडेने जांभूळ, कडूनिंब, गुलमोहोर, आसुपालव, आंबा, कॉपरपॉड इत्यादी अशी झाडं आहेत. पण चिमण्यांनी बगिच्यातल्या एका सुकलेल्या काष्ठवत् झुडुपात आसरा घेतला. ही आश्चर्याचीच बाब होती. झुडुपाच्या प्रत्येक लहान-मोठ्या काटकीच्या टोकावर एक चिमणी. जणू त्या झुडुपावर चिमण्याच उगवल्या आहेत. नंतर काही चिमण्यांनी ख्रिसमस ट्रीच्या खालच्या फांद्यांची निवड केलेली दिसली. जोगेश्वरीतील घराच्या अंगणातील फणसाच्या झाडाची मला आठवण झाली. संध्याकाळी खूपच चिमण्या येत. आणि बहुधा जागेवरून त्यांच्यामध्ये एवढा वाद होई की ते आख्खं झाडच चिवचिवाट करीत आहे, असे वाटे.

– कुंदा कुलकर्णी

९०११०६१६२६

# हा छंद जिवाला लावी 'पिसे' !

साधारण ९ वर्षांपूर्वी मी कळव्याला नवीन जागेत राहायला गेलो. इमारतीमागे गर्द झाडी व खिडकीतून बाहेर नजर टाकल्यावर रम्य असे वातावरण. तोपर्यंत नेहमीच्या ५-६ पक्ष्यांशिवाय मी पक्षीजगताबद्दल अनभिज्ञच. एक दिवस अचानक तांबूस-लालसर पंख व लालबुंद डोळे असलेला पक्षी समोरील झाडाच्या फांदीवरून बसतो. कावळ्याचा पंख तांबूस-लालसर कसा काय? असे कुतूहल जागृत होते. ते समजावून घेण्यासाठी एका मित्राला फोन. मग त्याच्या कळव्यातीलच एका मित्राचा मला फोन नंबर देऊन तो मला त्याच्याशी संपर्क करावयास सांगतो.

नंतर कळव्यातील त्या नवीन मित्राशी – 'विनय कर्णिक'शी संपर्क. त्यांच्याच मार्गदर्शनानुसार हळूहळू दुर्बीण, कॅमेरा, व्हिडिओ कॅमेरा घेतला जातो. बरोबरीने बीएनएचएसचे सभासदत्व व काही राष्ट्रीय उद्यानांच्या भेटी, मग आणखी काही ग्रुप्स / मित्रमंडळी. असे करता – करता पुढील काही वर्षात हा छंद जीवनालाच वेढून टाकतो.

सध्या, भारतातील २८४ पक्ष्यांच्या १००० हून अधिक व्हिडिओ क्लिप्स माझ्याकडे जमा झाल्या आहेत. (मी राहातो त्याच परिसरातील केवळ ५८ पक्ष्यांच्या व्हिडिओ क्लिप्ससुद्धा यात समाविष्ट आहेत.) व पुढील दोन वर्षात नवनवीन पक्ष्याची त्यात भर पडून ती संख्या ५०० च्या वर जावी असे माझे छोटेसे स्वप्न आहे.

पक्षीमित्रांना आनंद लुटता यावा यासाठी जमा होतील तसतसे सर्व व्हिडिओ मी यू- ट्यूब वरील माझ्या चॅनेलवर (लिंक - www.youtube.com/shrikantkelkar118) अपलोड करत असतो. आपल्याला फक्त चॅनेल वर जाऊन, 'सबस्क्राइब'च्या ठिकाणी क्लिक करून सभासद व्हायचे आहे व ते मोफत आहे.

– श्रीकांत केळकर

'टाकाऊतून टिकाऊ'चा अनोखा प्रयोग / पक्ष्यांना दाणा-पाण्याची सोय.

# नेचर क्लबच्या पक्ष्यांची शाळा



नाशिकमधील 'नेचर क्लब ऑफ नाशिक'तर्फे प्रबोधिनी विद्या मंदिरच्या प्रबोधिनीच्या वसतिगृहातील जागेत पक्ष्यांची शाळा हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. तीन महिन्यांपासून संस्थेचे कार्यकर्ते रोज सकाळी सात ते दहा या वेळेत येऊन या पक्ष्यांशी संवाद साधत होते. यावर्षी भीषण पाणी टंचाई ला नाशिककर सामोरे जात होते. त्यात पक्ष्यांचे, वन्य प्राण्यांचेदेखील खूप हाल होत होते. या पक्ष्यांना घरातील टाकाऊ वस्तूंपासून खाद्य आणि पाण्याची व्यवस्था करता येऊ शकते हा संदेश घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. याठिकाणी पाण्याच्या बाटल्यांमधून पाणी आणि खाद्य ठेवण्यासाठी फीडर संस्थेने एक रुपया खर्च न करता बनविले. रिकाम्या ऑईलच्या कॅन मधून फीडर तयार केले. नारळाच्या वाटीत खाद्य ठेवले. टायर पासून छोटे तलाव या ठिकाणी बनविले. आंबा, चिकू, फणस, वड, फालसा, चाफा, गुलमोहर आदी वृक्षांवर तारेच्या सहाय्याने ती लावण्यात आली. शेंगदाणे, विविध फळे, बिया, फरसाण हे खाद्य रोज देण्यात येत होते. दर दोन दिवसांनी पाणी बदलले जात होते आणि हे काम सुरू करताच पक्ष्यांनीदेखील जणू या शाळेचे स्वागत करीत प्रवेश घ्यायला सुरुवात केली. प्रथम या शाळेत बुलबुल या पक्ष्याने प्रवेश घेतला आणि मग दयाळ, किंगफिशर, तांबट, सनबर्ड चष्मेवाला कोकीळ, कावळा, होला, नाचरा, फ्ल्यायकॅचर, कबुतर, भारद्वाज, वटवट्या, शिंपी, आदी पक्षी एकामागून एक येऊ लागले आणि आता तीन महिन्यानंतर तब्बल तीस जातीच्या पक्ष्यांची नोंद या शाळेच्या माध्यमातून करता आली. या तीन महिन्यात अनेक पक्ष्यांचे राहणीमान, त्यांच्या आवडी निवडी चा अभ्यासदेखील संस्थेने केला. बुलबुल पक्षी मादीची निवड करताना दोन नरांमधील भांडण, त्यांची फ्री स्टाईल मातीवरील कुस्ती. तांबट रोज सकाळी गुलमोहरावर सुंदर गाणे गाऊन जणू शाळेची प्रार्थना म्हणत असल्याचे दिसून येत असे. इंडियन रॉबिन पक्ष्याचे शेपूट वर करून होणारे नृत्य बघितल्यावर शाळेतील स्नेहसंमेलन भरल्याचे जाणवत होते. टायरपासून केलेल्या तलावात खारूताई, बेडूक आणि चक्क सापदेखील बघावयास मिळाले. जास्वंदीच्या फुलातून रस पिणारा सूर्यपक्षी, होला या पक्ष्याचे अंडे पळविणारी कोकिळा, हे सर्व या शाळेत बघावयास मिळाले. आपल्या घरातील परसबागेत, बाल्कनीमध्ये असे प्रयोग केले तर पक्ष्यांना दाणा-पाणी आणि आपल्याला पक्ष्यांची सुंदर दुनिया बघण्याची संधीदेखील मिळू शकणार आहे.

– आनंद बोरा.


## स्वागत नव्या सभासदांचे (२८ मे २०१६ ते १८ ऑगस्ट २०१६)

| क्र. | नाव | पत्ता | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| ९४९ | श्री. नरेंद्र श्रावणजी लोहबरे | चंद्रपूर | ९४०४७८७५४८ | n.lohabare@gmail.com |
| ९५० | श्री. अमर संपत पाटील | कोल्हापूर | ९८९०२०९३७५ | - |
| ९५१ | श्रीमती वर्षा अंबादास कदम | कोल्हापूर | ९६५७९२७१२३ | varshak2172@yahoo.com |
| ९५२ | श्री. संजय इंगळे तिगावकर | वर्धा | ९७६५०४७६७२ | sanjayingletigaonkar@gmail.com |
| ९५३ | श्री. अविनाश सुखदेवराव वाघ | वर्धा | ८६००४९८६५५ | avinashwaghlokmat@gmail.com |
| ९५४ | श्री. प्रमेय पी. देशपांडे | अमरावती | ९८२८७२०२७९ | 1991996prameyapd@gmail.com |
| ९५५ | कु. सुहानी दिलीप तिवारी | अमरावती | ९०४९४७५७८७ | 123prathameshdt@gmail.com |
| ९५६ | श्री. प्रशांत सुरेशराव गवळी | यवतमाळ | ९४२१७७०७४८ | - |
| ९५७ | श्री. विनायक श्रीराम साळवे | वर्धा | ९१५६६२७९७० | vinayaksalve125@gmail.com |
| ९५८ | श्री. धनंजय छगन गुट्टे | लातूर | ९७६५०००१४१ | dhananjay.gutte@gmail.com |
| ९५९ | श्री. श्रीराम नंदकिशोर घाईट | बुलढाणा | ९७६३३१७११७ | shreeramgmaharaj@gmail.com |
| ९६० | डॉ. गोकुळ बी. काळे | बुलढाणा | ९४२२८८५१८१ | gokulbkale@gmail.com |

## स्वागत

महाराष्ट्रातील कोकण विभागाबद्दल बऱ्याच लोकांना आकर्षण असते ते प्रामुख्याने तेथे असलेल्या निसर्ग-बहरामुळे. नेमका हाच विषय घेऊन निसर्ग संरक्षण-संवर्धन यासाठी 'निसर्गधन कोकणचे' या पुस्तकाचे प्रकाशन केले गेले. चिपळूण येथील निसर्ग-अभ्यासक श्री. राम मोने यांनी या पुस्तकाचे लेखन केले आहे. संपूर्ण पुस्तक हे रंगीत चित्ररूपी असल्याने व आटोपशीर १४८ पाने असल्याने सुबक व आकर्षक बनले आहे. नुकतीच ह्या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली.

लेखकाने सर्वप्रथम 'कोकणचे अधिवास' हा विषय सादर केला आहे. त्यामध्ये कोकणात दिसणाऱ्या अधिवासांचे (हॅबिटॅट) सुरेख छायाचित्रण बघावयास मिळते. समुद्रकिनारा, खाडी परिसर, खारफुटीचे जंगल यापासून ते दलदल, पाणवठा, देवराई यापर्यंतच्या १६ विविध अधिवासांची प्रकाशचित्रे आहेत. त्यातून कोकणचे नेमके चित्र आपल्या नजरेपुढे येते. त्यानंतर 'भरारते कोकण' या भागात कोकणात दिसणाऱ्या विविध पक्ष्यांची (१४४ पक्षी) माहिती व प्रकाशचित्रे आपणास बघावयास मिळतात. प्रत्येक आकर्षक छायाचित्राबरोबर त्या पक्ष्याचे मराठी नाव, इंग्रजी नाव, शास्त्रीय नाव, आकारमान, त्या पक्ष्याच्या वसतिस्थानाबद्दलची माहिती, वीण हंगाम, नर-मादी, वैशिष्ट्ये, आढळ व खाद्य यासंबंधीची अतिशय उपयोगी व आटोपशीर माहिती आपणास मिळते. त्याअगोदर लेखकाने पक्ष्याचे अवयव, पंखांचे विस्तारण, पक्ष्यांच्या पायांचे विविध प्रकार, चोचींचे प्रकार, पक्ष्यांचे खाद्य, तसेच, पक्ष्यांची घरबांधणी यासंबंधीची प्रकाशचित्रे व माहिती दिली आहे.





*निसर्गधन कोकणचे, लेखक - श्री.राम मोने*
*प्रकाशक - इला फाउंडेशन/सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र*
*पृष्ठे : १४८, किंमत ₹३५०/-*

कोकणातील अजून एक महत्त्वाचे आकर्षण म्हणजे तेथील वनस्पती, फुले, फळे. 'हिरवाई' या विभागात लेखकाने कोकणातील विविध १०३ वनस्पतींची छायाचित्ररूपी माहिती दिली आहे. यामध्ये प्रत्येक वनस्पतीचे मराठी नाव, इंग्रजी नाव, उंची सरासरी, फुलांचा हंगाम, आढळ, फळे, उपयोग, इ. अतिशय उपयोगी माहिती या लेखामध्ये गुंफली आहे. त्याअगोदर फळांचे विविध प्रकार, सालींचे प्रकार, पानांचे विविध प्रकार यांची माहितीही अतिशय उपयुक्त आहे. कोकण विभागात पावसाचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे येथील वृक्षांवर 'बांडगुळांचे' निरीक्षणही आपणास करता येते. यासंबंधीची माहिती व प्रकाशचित्रे अत्यंत आकर्षकरीत्या लेखकाने टिपली आहेत. ही बांडगुळं नसून त्यांना आमरी किंवा इंग्रजीत ऑर्किड असे म्हणतात. विविध प्रकारच्या दहा आमरींची माहिती येथे दिली आहे. त्याप्रमाणे कोकणातला अतिशय महत्त्वाचा अधिवास म्हणजे 'खारफुटी'. अशा खारफुटींच्या विविध १४ प्रकारांची प्रकाशचित्ररूपी माहिती ह्या पुस्तकाचा विशेष ठेवा म्हणावा लागेल.

जैवविधतेने नटलेल्या कोकणात पक्षी व वृक्षांबरोबरच प्राणिमात्रांची गणतीपण अधिक आहे. त्यामधील सरपटणारे प्राणी व कीटकांची सचित्र माहिती लेखकाने ह्या पुस्तकात दिली आहे. सर्प हा कोकणातील एक अविभाज्य घटक आहे. अशा पाच विषारी, एक निमविषारी व सहा बिनविषारी सर्पांबद्दल सचित्र माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रकाशचित्रांबरोबरच त्यांचे मराठी नाव, इंग्रजी नाव, लांबी, वीण हंगाम, आढळ व खाद्य यासंबंधीची माहिती वाचकास उपयुक्त ठरावी. त्याचप्रमाणे नद्या व खाडींमध्ये आढळणाऱ्या मगर व जलमांजर यांची माहिती व चित्रे आकर्षक आहेत. इतर वन्यजीवांमध्ये विविध कीटक, फुलपाखरे, पतंग, कोळी, खेकडे, सरडे, कासवे व वटवाघुळे यांची प्रकाशचित्रे व मराठी आणि इंग्रजी नावे (५७ प्रकारचे) आपले लक्ष वेधून घेतात.

अशा या अतिशय आटोपशीर पण आकर्षक व चित्तवेधक प्रकाशचित्रांमुळे पुस्तकाचे महत्त्व अनन्यसाधारण ठरावे. प्रत्येक निसर्गवाचकासाठी हे पुस्तक म्हणजे खरोखरी 'कोकणचे निसर्गधन' ठरावे.

– सतीश गोगटे, ९८२२०५९९९२




## चितळ

निसर्गरम्य अशा डेहराडूनमधून 'द वाइल्ड लाइफ प्रिझर्वेशन सोसायटी ऑफ इंडिया' ही संस्था गेल्या ५२ वर्षांपासून वन्यजीव संरक्षणार्थ कार्यरत आहे. कै. ए. एस. नेगी हे वन खात्यातील अधिकारी त्या संस्थेत अनेक वर्षे विविध पदांवर कार्यरत होते. शेवटची दोन वर्षे ते अध्यक्षपदाची धुरा सांभाळत होते. या संस्थेतर्फे चितळ हे त्रैमासिक अखंडपणे प्रसिद्ध होत आहे. जुलै ते डिसेंबर २०१५ चा जोड अंक कै. नेगींच्या स्मरणार्थ प्रसिद्ध झाला आहे.

या अंकात नेगींच्या श्रद्धांजलीपर लेखांशिवाय त्यांनी लिहिलेले अनेक लेख प्रसिद्ध केलेले आहेत.

निसर्गप्रेमींनी संस्थेचे सभासद व्हावे, असे आवाहन आहे.

## सतरावे विदर्भ विभाग पक्षीमित्र संमेलन

बहार नेचर फाउंडेशनच्या आयोजनातून सतरावे विदर्भ विभाग पक्षीमित्र संमेलन वर्धा येथे १० व ११ डिसेंबर २०१६ रोजी होणार आहे. या संमेलनाचा विषय पक्ष्यांच्या शिकारी व अवैध व्यापार - सद्यःस्थिती व उपाययोजना असा आहे.

संपर्क : प्रा. किशोर वानखेडे (९८८१४८८७५६)
आर्किटेक्ट रवींद्र पाटील (९४२२१४११४२)

# शिकारी पक्ष्यांच्या संवर्धनासाठी करार

निसर्गाच्या अन्नसाखळीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या शिकारी पक्ष्यांच्या संवर्धनासाठी पर्यावरण मंत्रालयाने पुढाकार घेतला आहे. कीटकनाशके, नष्ट होत असलेले अधिवास आणि दुष्काळापासून त्यांना वाचविण्यासाठी मंत्रालयाने 'कॉन्झर्व्हेशन ऑफ मायग्रेटरी स्पिसिज' (सीएमएस) या संस्थेबरोबर करार केला आहे. या उपक्रमात सहभागी होणारा भारत हा ५६वा देश ठरला आहे.

शिकारी पक्षी संवर्धन करार ऑक्टोबर २००८ मध्ये जागतिक पातळीवर चर्चेत आला आणि त्याची अंमलबजावणी नोव्हेंबरमध्ये सुरू झाली. जगभरातील शिकारी पक्षी, मुख्यतः स्थलांतर करणाऱ्या शिकारी पक्ष्यांच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. सीएमएस संस्थेने या संदर्भात विविध देशांतील अभ्यासकांशी संवाद साधून पन्नासहून अधिक देशांबरोबर करार केला आहे. भारताकडे गेल्या सहा वर्षांपासून पाठपुरावा सुरू होता, अखेर केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाने गेल्या आठवड्यात करारावर स्वाक्षरी केली आहे.

आंतराष्ट्रीय करारामध्ये ७६ शिकारी पक्ष्यांना वाचविण्याचा आराखडा निश्चित झाला आहे. यातील गिधाडे, फाल्कन, गरूड, घुबड, हॉक, घारी आणि हॅरिअर्स असे ४६ प्रकारचे पक्षी भारतात आढळतात. याशिवाय थंडीमध्ये अनेक पक्षी भारतभेटीस येतात. या उपक्रमामुळे देशात येणाऱ्या शिकारी पक्ष्यांचा अधिवास वाचविण्यासाठी; तसेच कीटकनाशकांचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी सर्वच राज्यांना पुढाकार घ्यावा लागणार आहे.

शिकारी पक्ष्यांचा आजपर्यंत झालेला अभ्यास फार मर्यादित आहे. कडेकपारीमध्ये राहाणाऱ्या पक्ष्यांना शोधणे, त्यांचा प्रजननाचा काळ, घरट्यातील हालचालीची माहिती मिळविण्यासाठी अभ्यासकांचेही प्रयत्न सुरू आहेत. या करारामुळे संशोधनास प्रोत्साहन मिळेल. याशिवाय आंतराष्ट्रीय पातळीवरही माहितीचे आदान-प्रदान शक्य होईल आणि संशोधनाचा पाया भक्कम झाल्यावर या पक्ष्यांचे अधिवास जतन करण्यास योग्य दिशा मिळेल, असे मुख्य वनसंरक्षक सुनील लिमये यांनी सांगितले.

शिकारी पक्षी अनेक वर्षांपासून संकटात सापडले आहेत. वेगाने नष्ट झालेली गिधाडे याचे उदाहरण. डायक्लोफिनॅक या औषधामुळे गिधाडे आणि स्टेप इगल धोक्यात आले, तर अंधश्रद्धेमुळे घुबडे संकटात सापडली. गेल्या वर्षी दहा स्टेप इगल पाचगणी येथील कचऱ्याच्या डंपिंग ग्राउंडवर मृत्युमुखी पडल्याचे आढळून आले. इंटरनॅशनल युनिअन ऑफ कॉन्झर्व्हेशन ऑफ नेचरच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या यादीत स्टेप इगल हा पक्षी नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या पक्ष्यांच्या यादीत गेला आहे. भारतामध्ये येणारे बहुतांश शिकारी स्थलांतरित पक्षी युरोपमधून येतात आणि पुढे आफ्रिकेच्या दिशेने जातात. त्यामुळे तिन्ही पातळ्यांवर त्यांच्या संवर्धनासाठी एकत्रित प्रयत्न झाले पाहिजेत. तरच या प्रजातींना वाचविण्यास आपल्याला यश येईल असे बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ विभू प्रकाश यांनी सांगितले.

**गिधाडांसाठी मावळमध्ये कॅमेरे**

निसर्गाचे स्वच्छता कामगार असलेल्या गिधाडांचा अधिवास, त्यांचा प्रवास आणि वसतिस्थानांच्या संशोधनात्मक अभ्यासासाठी वन विभाग आणि इला फाउंडेशनतर्फे मावळ भागात अभिनव उपक्रम राबविण्यात आला आहे. गिधाडांच्या वसाहतींवर, घरट्यातील त्यांच्या हालचालींवर दिवसरात्र लक्ष ठेवण्यासाठी त्यांनी कॅमेरे बसवले आहेत. विशेष म्हणजे यामुळे पहिल्यांदा वन विभागाला कॅमेऱ्यातील शुटिंगच्या सहाय्याने गिधाडांचे जीवनचक्र, पिल्लांचे संगोपन आणि त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांची माहिती मिळाली आहे. याशिवाय आता केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाने आठ गिधाडांना कॉलर बसविण्याची परवानगी दिली आहे.

(महाराष्ट्र टाइम्स वरून)

# डोंबिवलीत आनंदाचा चिवचिवाट

चिमण्यांची झपाट्याने घटणारी संख्या पाहता चिमण्या वाचविण्याची मोहीम सर्वत्र राबविली जात आहे. मात्र, केवळ चिमण्यांसाठी दाणापाण्याची व्यवस्था करून किंवा पुठ्ठ्याची घरटी बनवून चिमण्या वाचवण्याचा प्रयत्न होतोच आहे. आता त्याही पुढे जाऊन रोटरी क्लब ऑफ डोंबिवलीने चिमण्यांचे जतन संवर्धन आणि त्यांची सविस्तर माहिती देण्यासाठी चिमणी पार्क उभारण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. डोंबवलीतील घरडा सर्कल जवळील सचान स्मारकाच्या परिसराची यासाठी निवड करण्यात आली असून या ठिकाणी चिमण्यांचे जतन आणि संवर्धन केले जाणार आहे.

३० फूट व्यासाचा फायबरचा डोम उभारून त्यामध्ये छोट्या पक्ष्यांना सहज ये-जा करता येईल, अशा पद्धतीने जाळी बसविली जणार आहे. तर पक्ष्यांना लागणारे कीटक आणि मध पाझरणाऱ्या फुलझाडांची या परिसरात लागवड करून छोट्या पक्ष्यांना आकर्षित केले जाणार आहे. या डोममध्ये गिधाड, कावळे या पक्ष्यांना जाता येणार नसल्यामुळे चिमण्या आणि इतर छोट्या पक्ष्यांची अंडी याठिकाणी सुरक्षित राहतील. तर प्रवेशद्वारावर चिमणी स्तंभ उभारून तरुणाईसाठी सेल्फी पॉइंट तयार केला जाणार आहे. याशिवाय पक्ष्यांची माहिती, त्यांचा प्रजोत्पादन कालावधी याची सविस्तर माहिती देणारे पोस्टर लावले जाणार आहेत. परिसरात असलेल्या ॲम्फी थिएटरची दुरुस्ती करून याठिकाणी विद्यार्थ्यांसाठी पक्षीविषयक माहिती सत्रे आयोजित केले जाणार आहेत.

मुंबईसह देशभरात अनेक ठिकाणी चिमण्या वाचवण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जात असले तरी परिपूर्ण पार्क ही संकल्पना कोठेही नाही. यामुळेच त्यामानाने माणसात राहण्याची सवय झालेल्या चिमण्यांचे जतन करून त्यांच्या विश्वाची सविस्तर माहिती देणारे संग्रहालय तयार करण्याची संकल्पना डोंबिवली पश्चिम रोटरीचे अध्यक्ष राजीव मोहिते यांनी मांडली आणि इतर सदस्यांच्या मदतीने त्यांनी त्याला मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. १५ लाख रुपये खर्च करून हे पार्क उभारले जाणार असून ३० जून रोजी याची मुहूर्तमेढ रोवली आहे. जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमधून शिक्षण घेतलेल्या मोहिते यांनी त्या प्रकल्पाचे रेखाचित्र स्वतःच रेखाटले असून टप्प्याटप्प्याने हे काम पूर्ण केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

(लोकसत्तावरून)

# दुर्मिळ 'रेड फालोरोप' पक्ष्याचे उजनी जलाशयात दर्शन

विणीच्या हंगामात आर्क्टिकच्या बर्फाळ भागात राहणारा आणि उर्वरित बहुतेक काळ समुद्रात राहणारा 'रेड फालोरोप' हा दुर्मिळ पक्षी भिगवण येथे उजनी जलाशयात दिसला आहे. स्थलांतरणाच्या वेळी रस्ता चुकून हा पक्षी थव्यातून बाहेर पडला असावा, असा पक्षी अभ्यासकांचा अंदाज आहे. देशात यापूर्वी हा पक्षी आढळल्याच्या फारशा नोंदी नसल्यामुळे पुण्याजवळ तो दिसणे ही दुर्मीळ बाब मानली जात आहे.

वन्यजीव छायाचित्रकार व पक्षी अभ्यासक राहुल सचदेव यांच्यासह संगमेश्वर धत्तर्गी, जनकराजन सरवानन व श्रीहरी के या छायाचित्रकारांच्या चमूने १८ मार्चला उजनी जलाशयात हा पक्षी पाहिला. परंतु 'रेड नेक फालोरोप' असाही एक पक्षी असून त्याच्यात व या पक्ष्यात खूप साम्य असल्यामुळे प्रथमदर्शनी तो 'रेड नेक फालोरोप'च असावा, असे वाटले. नंतर या पक्ष्याची छायाचित्रे पाहून पक्षी अभ्यासक आदेश शिवकर यांनी तो 'रेड नेक' नव्हे तर 'रेड फालोरोप' पक्षी असल्याचे सांगितले. छायाचित्रकार राहुल उंब्रजकर यांनी ही माहिती दिली. ''या दोन प्रजातींचे पक्षी सारखे दिसत असले तरी विणीच्या हंगामात एप्रिल ते जुलै दरम्यान 'रेड नेक'ची मान लाल रंगाची दिसते, तर 'रेड फालोरोप'चे संपूर्ण अंग लाल दिसते. इतर काळात हे पक्षी पांढरे व एकसारखेच दिसू लागतात,'' असे शिवकर यांनी सांगितले. ते म्हणाले, '' 'रेड फालोरोप' पक्ष्याची चोच थोडी जाडसर असून त्याच्या तळाशी पिवळा रंग असतो व या प्रमुख फरकावरून पक्षी ओळखता येतो. आपल्याकडे 'रेड नेक फालोरोप' गुजरात, मुंबई, तमिळनाडू येथे दिसतो. परंतु 'रेड फालोरोप' दुर्मीळ असून तो चौथ्यांदा वा पाचव्यांदाच दिसतो आहे.''



(छाया : राहुल उंब्रजकर)

'रेड फालोरोप' यापूर्वी २०१२ मध्ये राजस्थानला, २०१३ मध्ये नागपूर व हैद्राबादला व २०१४ मध्ये अमरावतीला दिसल्याच्या नोंदी आहेत.

(लोकसत्तावरून)

# चाळिसावे बाळंतपण

शीर्षक वाचून कोणाच्याही भुवया उंचावतील. पण हे बाळंतपण एखाद्या महिलेचे नसून एका पक्षिणीचे आहे. हवाईतील राष्ट्रीय वन्यजीव आश्रयस्थानात विस्डम या नावाने ओळखल्या जात असणाऱ्या लेसन अल्बट्रॉस (Phoebastria immutabillis) मादीने २८ नोव्हेंबर २०१५ या दिवशी एक अंडे दिले. अनेक आठवडे ते अंडे उबवल्यावर त्यातून १ फेब्रुवारी रोजी पिलू बाहेर आले. हा जन्मसोहळा बघायला ती आई हजर नव्हती. कारण इतके दिवस अंडे उबवीत बसण्याच्या श्रमानंतर ती उदरभरणासाठी २० जानेवारीला सागर सफरीवर गेली होती. पण या सोहळ्याच्या वेळी पिलाचा पिता मागे राहिलेला होता. भरगच्च चरून ती ७ फेब्रुवारीला परत आली तेव्हा तिच्या युवराजांचे आगमन झालेले होते. त्याचे नामकरण कुकिनी असे झालेले होते. त्याचा अर्थ निरोप्या.

या घटनेवर भाष्य करताना त्या आश्रयस्थानाचे प्रमुख रॉबर्ट पीटन म्हणतात, ''विस्डम हे प्रेरणा आणि आशेचे प्रतीक आहे. कारण अलबट्रॉस पक्षी हे समुद्राच्या आरोग्याचे प्रतीक आहे. सागरावर कोट्यवधी मानव अवलंबून असतात.'' अलबट्रॉस हे दीर्घजीवी पक्षी आहेत.

१९५६ साली विस्डमला कडे अडकवून तिचे नामकरण झाले तेव्हा ती प्रसूतिक्षम होती. २००६ पासून तिने आठ वेळा पिलू दिलेले आहे. २०११ च्या जपान त्सुनामीतून ती बचावली होती. तिचे साठ वर्षांचे आयुष्य हा एक विक्रम आहे. यापूर्वीचा विक्रम तिने दहा वर्षांनी मोडला आहे. १९५६ पासून म्हणजे तिला कडे अडकविल्यापासून तिने ४८ लाख किलोमीटर प्रवास केला असावा! हे अंतर म्हणजे पृथ्वी ते चंद्र व परत अशा सहा फेऱ्यांइतके होते!

१९५६ साली चँडलर रॉबिन्स या शास्त्रज्ञाने विस्डमला कडे अडकवले होते. त्यांना ती पुन्हा ४६ वर्षांनी दिसली होती. रॉबीन्स आता ९७ वर्षांचे आहेत. अजूनही ते अधूनमधून पक्ष्यांची खबरबात घेत असतात.

हवाईमध्ये अलबट्रॉसची ४ लक्ष ७० हजार घरटी आहेत. एका घरट्यामध्ये दोन पक्षी या हिशेबाने तिथे ९ लक्ष ४० हजार पक्षी आहेत. दरवर्षी नोव्हेंबर अखेरीस एवढे पक्षी तिथे जमतात. हौसमौज करून पुढची पिढी जन्माला घालतात.

(नेटवरून)

# पक्ष्यांची स्मरणशक्ती

पाठोपाठ दोन वर्षे ॲन आरबार, मिशिगन येथे जाण्याचा योग आला. मुलाने त्याच्या घराच्या डेकवर हमिंगबर्ड फीडर लावले आहेत. गेल्या सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत – फॉलपर्यंत हमिंगबर्ड येत होते, पण त्यानंतर ते स्थलांतरित झाले. या जूनच्या पहिल्या आठवड्यात परत गेलो तोपर्यंत फीडर लावले नव्हते. परंतु आदल्या वर्षी ज्या दोन ठिकाणी लावले होते तेथे खाद्याच्या आशेने सारख्या फेऱ्या चालू होत्या. त्यांना 'मेमरी' असते, हे सिद्ध झाले. अधिक माहिती घेताना असे कळले की सलग सहा तास त्यांना 'पेय' मिळाले नाही तर ते उपासमारीने मरू शकतात. रोज रात्री 'शीतनिद्रेत' जातात, तेव्हा त्यांच्या हृदयाचा वेग ३ ते ५ ठोके प्रति मिनिट इतकाच असतो. त्यांचे आयुष्य १० वर्षांपर्यंत असू शकते. हमिंग बर्ड नर टेरिटोरिअल असतात. जवळच्याच एका झाडावर हा नर बसून इतरांना हाकलायचे काम करत असे.

गेली ७ वर्षे माझा मुलगा हे फीडर्स लावत आहे. पण यंदा दुसरी मजेदार गोष्ट प्रथम आढळली. या फीडरवर रोज २/३ वेळा गोल्डन ओरिअलचे जोडपे पण येऊ लागले होते. बाहेर भरपूर खाद्य असताना सुद्धा!

– डॉ. प्रकाश जोगळेकर, पुणे

मो.९४२२३३९१०६

टपाल तिकिटांच्या दुनियेत

# पहाडी मैना (Hill Myna - Gracula religiosa)

पहाडी मैना 'सारिका' या नावाने ओळखली जाते. जंगलात राहणारी असून तिचा संसार झाडावर असतो. तिचे सारे शरीर चकचकीत काळे असते व काळ्या पंखात पांढरा डाग असतो. तिचे पाय व चोच गर्द पिवळी असते. तिच्या गालावर व मानेवर नारंगी पिवळी कातडी असते. हे पहाडी मैनेचे खास वैशिष्ट्य असते. तिच्या डोक्यावर पिवळा कल्ला असतो. नर-मादीचे रंगरूप सारखेच असते. पहाडी मैना नेहमी दाट डोंगराळ जंगलातल्या झाडीत राहातात. हरियल व इतर फलहारी पक्ष्यांच्या बरोबर त्या दिसतात. उंबर, वड, पिंपळ व त्या जातीतल्या झाडांची फळे त्यांना खूप आवडतात. नाना प्रकारचे आवाज करून त्या गोंधळ घालतात. इतर पक्ष्यांच्या आवाजाच्या नकला करतात. माणसाचे शब्दही उच्चारायला त्या शिकतात. शब्दांच्या नकला करून बोलणारी पहाडी मैना जगभर प्रसिद्ध आहे.



मार्च ते ऑक्टोबरपर्यंत त्यांचा प्रजोत्पादनाचा काळ असतो. उंच गर्द पालवीचे झाड त्या घरट्यासाठी निवडतात. ५०-६० फूट उंच खोडावरील नैसर्गिक ढोली त्या घरट्यासाठी निवडतात. मादी त्यात २-३ निळसर अंडी घालते. त्यावर लाल-तपकिरी ठिपके असतात. नर-मादी दोघेही पिलांना भरवितात.

पहाडी मैना हिमालयाच्या पायथ्याला २५०० फूट उंच भागातील कुमाऊ, आसाम, गढवालमधील जंगलात दिसतात. ओरिसा, मध्यप्रदेश व छत्तीसगड मधील डोंगरी जंगलात आहेत. छत्तीसगडचा राज्य पक्षी होण्याचा बहुमान पहाडी मैनेला मिळाला आहे. त्यामुळेच २००७ साली छत्तीसगडमध्ये भरलेल्या राज्यस्तरीय डाक तिकिट प्रदर्शनातील पहाडी मैनेच्या विशेष आवरणावर पहाडी मैनेचे चित्र व शिक्का मारला आहे. तसेच नुकतेच २५ जून २०१६ रोजी कांगेर घाटी राष्ट्रीय उद्यान, जगदलपूरच्या विशेष आवरणावर पहाडी मैनेचे चित्र व विशेष शिक्का मारला आहे.

– रवींद्र वामनाचार्य

*मोबाईल : ९८९०३९०५२७,*

*इ-मेल : r_wamanacharya@yahoo.co.in*

# ३०वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन

महाराष्ट्र राज्य ३०वे पक्षीमित्र संमेलन दि. ७ व ८ जानेवारी २०१७ (शनिवार व रविवार) रोजी आंबेजोगाई येथे आयोजित करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यात गेली ४ वर्षे दुष्काळजन्य परिस्थिती असल्याने या संमेलनात 'प्रतिकूल परिस्थितीत पक्ष्यांचे संवर्धन व संगोपन' या विषयावर विचारमंथन व्हावे असे ठरले आहे.

युथ एन्व्हायर्मेंटल सोसायटी, आंबेजोगाई (YES) ही संस्था या पक्षीमित्र संमेलनाचे आतिथ्य करीत असून ही संस्था गेली ४-५ वर्षे पक्ष्यांशी निगडित नोंदी ठेवीत आहे. आतापर्यंत स्थानिक व स्थलांतरित मिळून १९५ पक्षी प्रजातींची नोंद या परिसरात झाली आहे. त्याची एक पुस्तिका संस्थेने प्रकाशित केली आहे.

आंबेजोगाई हे शहर महाराष्ट्रातील जवळपास सर्व जिल्ह्यांशी एस.टी. सेवेने जोडलेले आहे. तसेच १२ ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग परळी वैजनाथ या रेल्वे स्टेशन असलेल्या शहरापासून २५ कि.मी. तर लातूर शहरापासून ५० कि.मी. अंतरावर आंबेजोगाई हे शहर आहे.

पक्षीमित्र संमेलनाच्या नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी खालील व्यक्तींशी संपर्क करावा -

रत्नाकर निकम (मोबाईल - ९६२३४२००६२), मुन्ना सोमाणी (मोबाईल - ९४२२५२७४०१), विजय लोखंडे (मोबाईल - ९८६०२६८८८८), सचिन सोमवंशी (मोबाईल - ९२२५९६९९०९), इ-मेल - yesambajogai7@gmail.com

या संमेलनासाठी ३० नोव्हेंबर २०१६ पर्यंत नोंदणी शुल्क रु.७५०/- १ डिसेंबर २०१६ पासून रु.८५०/- असे राहील. १०० लोकांसाठी एकत्रित निवासव्यवस्था विनामूल्य केलेली असून इच्छुकांनी संपर्क करून निवासव्यवस्था आरक्षित करणे गरजेचे आहे.

पक्षीमित्र संमेलनाचा पत्ता - अनिकेत मंगल कार्यालय, एल.आय.सी. ऑफिससमोर, परळी रोड, अंबाजोगाई.

या संमेलनात विषय सादरीकरणासाठी संपर्क - शंकर कराड (मो.९९२३०५०७०७), डॉ. शुभदा लोहिया (मो.९४२२७४४८४४), इ-मेल - shubhada.lohiya@gmail.com

## त्रैमासिक निधी

(२८ मे २०१६ ते १८ ऑगस्ट २०१६)

| क्र. | नाव | पत्ता | रक्कम | दिनांक | पावती क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. सुरेश यादव | मुंबई | १,०००/- | २४ जानेवारी २०१६ | २३५० |
| २ | श्रीमती केशर उपाध्ये | जळगाव | २,०००/- | १० जुलै २०१६ | ६४५ |

# माझे जंगल

चिपळूणची 'सह्याद्री निसर्ग मित्र' ही संस्था चालू वर्षात २५ वर्षे पूर्ण करीत आहे. या काळात त्यांनी विविध उपक्रम राबवून कोकणात जैवविविधता संवर्धनासाठी खूप प्रयत्न केले आहेत. रौप्य महोत्सवी वर्षात त्यांचा महत्त्वाकांक्षी 'माझे जंगल' (http://www.myjungle.in) हा प्रकल्प कार्यान्वित करावयाचा आहे.

कोकणची भूमी वन्यजीव आणि जंगलाने समृद्ध आहे. त्याच्या संरक्षणासाठी ठिकठिकाणच्या लोकांकडून तेथील जंगल संवर्धनाचे काम हाती घ्यावयाचे आहे. त्याच्यासाठी 'निसर्ग संवर्धनातून जीवन समृद्धी' हा उपक्रम हाती घ्यावयाचा आहे.

योजनेतील पथदर्शी प्रकल्प 'सह्याद्री निसर्ग मित्र'च्या मालकीच्या जंगलपट्ट्यातून पुढे येणार आहे. त्यासाठी चिपळूणपासून ३३ कि.मी. दूर असलेली ५७ एकर जमीन विकत घेणार आहेत. सह्याद्रीच्या पश्चिम उतारावर ही जमीन आहे. त्यासाठी संस्थेला ३० लाख रुपये खर्च येणार आहे. त्यांनी आतापर्यंत १५ लाख रुपये उभे केले आहेत. राहिलेली रक्कम महिनाभरात उभी करण्याचे आव्हान त्यांच्यापुढे आहे. त्यासाठी प्रत्येकाने रु.५० हजारांची मदत करावी किंवा वर्षभरासाठी तेवढी किंवा त्याहून अधिक रक्कम विनाव्याज वर्षभरासाठी अनामत म्हणून द्यावी, अशी विनंती संस्थेने केली आहे.



कोल्हापूर येथील आपले एक सभासद श्री. सुभाष पुरोहित यांना 'सुंदर पक्षी' या विषयावरील अमेरिकेतील (कॅलिफोर्निया) स्पर्धेत या चित्रास पारितोषिक मिळाले. त्यांचे अभिनंदन! आतापर्यंतचे त्यांचे हे सहावे आंतरराष्ट्रीय पारितोषिक आहे.

IUCN च्या निवेदनानुसार आजमितीला जगात ९,८६५ प्रजाती अस्तित्वात आहेत. त्यातील १,२२७ प्रजाती नष्ट होण्याचा धोका आहे तर ८३८ प्रजाती काहीशा धोकाग्रस्त आहेत. ७,७३५ प्रजातींना धोका नसून ६५ प्रजातींच्या स्थितीबद्दल पुरेशी माहिती नाही.

इ.स.१५०० पासून आजपर्यंत १३३ पक्षी जाती नष्ट झाल्या आहेत. शिवाय ४ जातींचे पक्षी वन्य जीवनात अस्तित्वात नाहीत. त्यांचे अस्तित्व केवळ पक्षी संग्रहालयात शिल्लक आहे.

Registered with the Registrar of Newspaper in India under serial No. MAHMAR/2012/51349

**Book Packet containing periodicals**

प्रति,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षीमित्र
११, युनायटेड पार्क, मार्कंडी,
चिपळूण, जि. रत्नागिरी – ४१५ ६०५
फोन : (०२३५५) २५३०३०
E-mail : pakshimitra@gmail.com
website : www.pakshimitra.org

**पक्षीमित्र**
संपादक : **दिगंबर गाडगीळ**
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : प्रिंटवेब, नाशिक
मुद्रक : एस्. व्ही. प्रेस – चिपळूण
फोन : (०२३५५) २५२३३०